कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसूचना/ ४२ /२०२६ दि. २० /०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कापुरबावडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत वर्तकनगर प्रभाग समिती कार्यक्षेत्रात केंद्रशासनाच्या अमृत २.० योजनेच्या अंतर्गत पाणी पुरवठा विभागाकडील ठाणे महानगरपालिकेच्या विभागातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे मजबुतीकरण व विस्तारीकरण करणेकरिता रवि स्टील नाका ते माजिवडा मेट्रो स्टेशन हरदासनगर पावेतो रवि स्टील नाक्याकडून ज्युपोटर हॉस्पोटल मार्गे कॅडबरीकडे जाणारे सेवा रस्त्याचे मध्यभागी जलवाहीनी टाकण्यासाठी खोदकाम करण्यात येणार आहे. सदर वेळी कॅडबरीकडून ज्युपीटर हॉस्पीटल समोरील सेवारस्त्याने रवि स्टील नाक्याकडे जाणारे सर्व प्रकारचे वाहनांना हरदासनगर कट येथे प्रवेश बंद करून, पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** कॅडबरी जंक्शनकडून उत्सव हॉटेल–विवियांना मॉल–ज्युपीटर हॉस्पीटल समोरून सेवा रस्त्याने रवि वनज काटा पोखरण रोड नंबर २ कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **हरदासनगर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही हरदासनगर कट येथुन डावे बाजूस वळण घेवुन,वसंत लॉन्स सोसायटी समोरील रोडने इच्छित स्थळी जातील.

ब) सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही ज्युपीटर कट येथुन उजवे बाजूस वळण घेवुन, ज्युपीटर हॉस्पीटल समोरील स्लीप रोडने इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** लोढा कासा मल्टीमा सोसायटी–टी.सी.एस.कंपनी– वसंत लॉन्स सोसायटी समोरल रोडने हरदासनगर कट येथुन डावीकडे वळण घेवुन सेवारस्त्याने रवि वनज काटा पोखरण रोड नंबर २ कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **हरदासनगर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही हरदासनगर कट येथुन उजवे बाजुस वळण घेवुन, ज्युपीटर हॉस्पीटल समोरील सेवा रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक २३/०२/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ३१/०३/२०२६ रोजी पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक
प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.